Vol 4 Issue 8 Feb 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *छत्रपती शिवराय – एक लोककल्याणकारी व्यक्तीमत्व*

***केशव अंबादास लहाने[1] , विनोद बी. बोरसे[2]***

[1]सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख , इतिहास विभाग , राजर्षी शाहू महाविदयालय ,पार्थी ता.फुलंब्री जि. औरंगाबाद.
[2]सहा.प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक , इतिहास विभाग , श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय , देवगाव रंगारी ता.कन्नड जि.औरंगाबाद,

***सांराश :*** छत्रपती शिवराय आणि लोककल्याणकारी व्यक्तीमत्व या विषयावर शोधनिबंध लिहीतांनी त्यांच्या व्यक्तीमत्वातील गुणसंकीर्नता पाहणे आवश्यक ठरते. छत्रपती शिवराय म्हणजे भारताचे अखंड स्फुर्तिस्थान, स्वदेश व स्वधर्म यांच्या संरक्षणार्थ आर्थिक , राजकीय दृष्टया सबळ हिंदवी स्वराज्याचे निर्माते, सार्वभौम राजा , रयतेच्या प्रतिष्ठेचा उदगाता , नूतन सृष्टीचा निर्माता , छत्रपती शिवराय म्हणजे एक महान युगपुरुष , यशवंत , किर्तीवंत ,वरदवंत, पुण्यवंत , नितीवंत जाणता राजा रचनात्मक कार्य करणारा मध्ययुगातील एक सर्वश्रेष्ठ बुध्दीमान महापुरुष , पुर्वेकडील देशातील एक महान राजकारणी धुरंदर , सर्वधर्मसहिष्णू व्रताचे पालनकर्ते , लोकनेतृत्वातून राजपद मिळविणारे लोकनायक, भारताचे सुपुत्र , व्यापक विचारशक्ती आणि कल्पकता अशा विविध गुणांनी संपन्न असलेले छत्रपती शिवरायांचे व्यक्तीमत्व आपणास दिसून येते.

## *प्रस्तावना :*

संपूर्ण भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात मराठयांचा इतिहास अद्वितिय असा आहे. भारतात मुस्लीम सत्तेच्या स्थापनेपासूनच राजपूतांनी त्यांना प्रतिकार करावयास सुरुवात केली. जवळजवळ ३५० वर्षे सतत संघर्ष केल्यानंतर मोगल सम्राट अकबराच्या शासन काळात राजपुतांनी श्शस्त्रे खाली ठेवलीत. अर्थात राणा प्रतांपासारखा अपवाद होता. पण एखादा दूसराच उत्तर भारतात राजपूतांनी जे कार्य केले ते किंबहूना त्यापेक्षाही जास्त महत्वाचे कार्य दक्षिणेत मराठयांनी केले. मराठे मुगलांना कधीही पुर्णपणे शरण गेले नाहीत. संपूर्ण भारत मुसलमानी सत्तेखाली असतांना हिंदू धर्म ,संस्कृती, अस्मिता टिकवून ठेवण्याची महान कामगिरी मराठयांनी महाराष्ट्रात केलेली दिसून येते.[1]

मराठयांचे स्वतंत्र्य सार्वभौम राज्य स्थापन करुन शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात एका नवीन पर्वाला सुरुवात केल्याची दिसून येते. या स्वराज्याचेच नंतरच्या काळात विशाल साम्राज्यात रुपांतर होऊन हिंदू पदपादशाही असे नाव त्यास प्राप्त झाले. भारतातील सर्वात शक्तीशाली सत्ता म्हणून मराठयांच्या साम्राज्यास ओळखले जात होते. या साम्राज्याच्या ऱ्हासानंतरच इंग्रजांना भारतावर सत्ता स्थापन करणे शक्य झाल्याचे आपणास दिसून येते. छ. शिवाजी महाराज फक्त स्वतंत्र्य राज्याचे संस्थापकच नव्हते तर अतिशय श्रेष्ठ दर्जाचे प्रशासक देखील होते. त्यांनी निर्माण केलेला राज्यकारभार ही वैशिष्टयेपूर्ण व कल्याणकारी स्वरुपाची असल्याचे दिसून येते.[2]

## *युरोपियन कायदेतज्ञाच्या शिवाजीराजांशी भेटी*

बऱ्याच सुप्रसिदध युरोपियन वकिलांनी शिवाजीराजांची भेट घेतली होती मात्र त्यांना आपल्या कामातच जास्त रस होता. जरी त्यांना राजाशी समक्ष बोलण्याची सुवर्णसंधी प्राप्त झालेली होती तरी राजाच्या व्यक्तीमत्वाबाबत त्यांनी तपशीलवार असे काही लिहून ठेवलेले नाही. इंग्रजांचा राजदूत म्हणून मुंबईहून स्टीफन उस्टिक १६७४ मध्ये गेला होता. शिवाय थॉमस निकोलस (१६७३) ऑक्झोंडन (१६७४) सॅम्युअल ऑस्टीन आर. जोन्स (१६७५) अशा अनेकांनी शिवाजी महाराजांची भेट घेतलेली होती.याशिवाय तेघनापटमच्या डच वरवारीचा प्रमुख मोठया नजराना घेऊन जूलै १६७७ मध्ये राजांना भेटायला गेला होता. याच महिन्यात फ्रेंचाचा जर्मन नावाचा प्रतिनिधीही कोलेरुन नदीच्या तीरावर राजांना भेटला होता. यापैकी कोणाच्याही लिखाणातून राजाच्या व्यक्तीमत्वाबददल फारशी काही माहिती मिळत नाही. ही गोष्ट दुदैवाची वाटते.

### शिवरायांच्या व्यक्तीगत व्यक्तीमत्वाविषयी वर्णन

छ.शिवाजी महाराजांचे व्यक्तीगत व्यक्तीमत्वाविषयी काही वर्णन केल्याचे दिसून येते. त्यामध्ये एस्केलियट यांनी राजांचे वर्णन मध्यम उंची आणि प्रमाणबदध शरीर असे केले आहे. छ.शिवराय कामात क्रियाशील , नजरेत तीक्ष्ण आणि वर्णात इतरांपेक्षा गोरे असून ते नेहमी स्मितहास्य करीत बोलत असे. असेही एस्केलियट म्हणतात.

६ जून १६७४ रोजी वयाच्या ४४ वर्षी झालेल्या राज्यभिषेकाच्या वेळी राजांचे वनज १४० इग्लीश पौड किंवा जास्तीत जास्त १६० डच पौड एवढे होते. थेवनॉटच्या मतानूसार छ.शिवाजी राजे उंचीला कमी आणि पिवळट तपकिरी वर्णाचे होते. ते लिहितात की छ.शिवरायांचे डोळे अतिशय तेजस्वी आणि तीक्ष्ण असून त्यातून त्याची श्रेष्ठ बुदधीमत्ता जाणवते शिवराय नेहमी दिवसातून एकदाच जेवण घेतात आणि त्यांचे आरोग्य चांगले आहे.

फादर डी ऑर्किन्स यांच्या मतानूसार " छत्रपती शिवराय चैतन्यशील पण काहीसे अस्वस्थ वाटतात मात्र कितीही अस्वस्थ वाटले तरी ते निर्णय क्षमता आणि पुराषार्थ यात मुळीच कमी नव्हते.

### कमालीचा साधेपणा

शिवाजीराजांच्या व्यक्तीमत्वाचा एक महत्वपुर्ण गुण म्हणजे कमालीचा साधपणा होय. आपल्या सैन्याबरोबर त्यांच्याप्रमाणे राहून त्यांनी सर्व कसोटीच्या व संकटाच्या प्रसंगाना आनंदाने तोंड दिले. त्यांची तत्वनिष्ठा मात्र अतिशय कडक होती. अधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या कुटुबीयांना व कुटुंबातील सदस्यांना मोहिमेत सहभाग करुन घ्यायला त्यांची सक्त मनाई होती. छावणीत नर्तकी ,स्त्रिया,व व्यवनाधीनते संबंधी पदार्थांना शिरकाव कधीच नव्हता. एखादया ठिकाणी वेगाने हल्ला करायचा असल्यास त्यांना अनावश्यक सामुग्रीचा अडथळा नको असे. १६६४ च्या सुरतच्या मोहिमेत राजे आपल्याला त्यांच्या तबुंत नाही तर एका झाडाखाली आढळतात. भोजन आणि पोशाख याबाबतीतही त्यांचा अतिशय साधेपणा दिसून येतो.३

### व्यसनापासून अलिप्तता

छत्रपती शिवराय व्यसनापासून व अमली पदार्थापासून एक व्रत म्हणून दूर राहीले. त्यातूलनेत सिकंदर आणि सीझार यासारखे रणधूरंधरही मदयांच्या अमलाखाली असत. किंबहूना नेपोलियन बोनापार्टही मदयपान करीत असत. बाबरापासून तर शहाजहानपर्यतच्या सर्व मोगल सम्राटाना मदयाचे आणि इतर अंमली पदार्थाचे व्यसन होते. मात्र या संदर्भात प्राचीन आणि समकालीन राजांपेक्षा कितीतरी उच्चतर पातळीवर असलेले छत्रपती शिवाजी महाराज होते हे याठिकाणी महत्वाचे वाटते. या संदर्भात मॉटगोमेरी मार्टिन यांचे उदगार याठिकाणी सांगावेसे वाटतात. ते म्हणतात की " शिवाजी राजाजवळ असे काही वेगळे गुण होते की ते हिंदू समाजात कौतुकास्पदच म्हणावे लागतात कोणत्याही प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची क्षमता त्यांच्यात होती ४ " कोणत्याही संकटाला व आपत्तीला न घाबरता सदैव सामना करण्याची जिदद व कार्यक्षमता त्याच्यात होती.

### स्त्रियांविषयी आदरभाव

शिवाजीराजांच्या सैन्यात स्त्रियांना आणण्यास परवानगी नव्हती. स्वराज्यातील सर्व अधिकारी,सेनापती,सैन्य आणि सामान्य जनता यांच्यासमोर त्यांनी स्त्रीविषयी नितीमत्तेचा नमूना सादर केलेला आपणास दिसून येतो.स्त्रियांना नेहमी दाक्षिण्यानेच वागवले जाई. युदधाच्या प्रसंगी स्त्रियांचा जीव घ्यायला आणि त्यांना कैद करण्यास बंदी होती. जेव्हा जेव्हा शिवरायांच्या सैनिकाच्या हाती स्त्रिया पडत तेव्हा तेव्हा त्यांना आदराची वागणूक देऊन त्यांना सन्मानाने सोडून दिले जात आसे.

मोगलांच्या सैन्यातील एक महिला सेनाप्रमूख रायबागीन ही शिवरायांच्या सैन्याबरोबर लढाई करीत असतांना तिचा शेवटी पराभव झाला आणि ती पकडली गेली. मात्र तिला तिच्या हुददयापासून योग्य ती सन्मानाची वागणूक देऊन सोडून देण्यात आल्याचे दिसून येते.[५] अशा प्रकारे सर्व जातीच्या, धर्माच्या, व पंथाच्या स्त्रियांना देण्यात येणाऱ्या वागणूकीच्या संदर्भात राजांनी उच्च आदर्श घालून दिलेले होते. त्यांच्या समकालीन राजेलोकांपेक्षा शिवाजीराजांची जीवनमुल्य या संदर्भात फारच उच्च होती.हे स्पष्ट होते.[६]

### छ.शिवराय एक महान सेनानायक

संपूर्ण जगातील सेनानायकांच्या क्रमांकात शिवाजीराजाचे स्थान प्रथम दर्जाचे आहे.१६४५ ते १६८० या शिवरायांच्या संपूर्ण कारकिर्दीत सामर्थ्यशाली मोगलांचा किंवा विजापूरकरांचा असा एकही हिंदू किंवा मुसलमान सेनानायक नव्हता की ज्यांचा शिवाजी महाराजांनी पराभव केला नाही. शहाजादे, इराणी व पठाण सरदार तसेच जसवंतसिंग राठोड सारखे राजपूत राजे या सर्वांनी छ.शिवरायांपूढे हात टेकले होते. वैयक्तीक शौर्य, सेनेचा संघटक, व नायक म्हणून

शिवाजीराजे अग्रगण्य ठरले होते.धैर्य ,सावधानता आणि कल्पकता हे त्यांचे लष्करी गुण यावेळी महत्वाचे व सर्वपरिचित वाटतात. शत्रु बेसावध असतांना अचानक हल्ले चढवून त्यास चकित करणे आणि आपला विजय मिळवून घेणे हे शिवरायांचे विशेष वैशिष्टये होते. याबाबतीत जगातील कोणत्याही दुसऱ्या राजाला किंवा नेत्याला शिवरायांची बरोबरी करता आली नाही. अफजलखानाशी केलेले युदध, शायस्तेखानावर छापा ,सुरतेवरची लूट एवढेच नाही तर औरंगजेबाच्या दरबारात त्यांनी केलेला बिनधास्त प्रवेश या सर्व गोष्टी वरील विधानाची व गुणांची आपणास प्रचिती देतात. राजा सिकंदर आणि राजा फ्रेडरिक यांना त्यांच्या वडीलाकडून प्रशिक्षित अशा सैन्याचा वारसा लाभलेला होता मात्र असा वारसा शिवरायांना लाभलेला नव्हता, राजांना त्यांची फौज अल्प काळात स्वतःच प्रशिक्षित करावी लागली. त्यांनी सैन्यात विदयावान , कारकून, शेतकरी, खेडयातील सामान्य लोक, आदिवासी इ.सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश केलेला होता. सर्व विरोधी सत्तांना पाणी पाजणारे सैन्य महाराजांनी निर्माण केले. ही मोठी अदभूत गोष्ट याठिकाणी नमूद करावीशी वाटते. शेकडो सेनाधूरंधरांना शिवरायांनी प्रशिक्षित केल्यामुळे राजांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या संकटाच्या काळात मराठयांचे स्वातंत्र्य या लोकांनी जगाच्या पाठीवरील सर्व बलाढय अशा साम्राज्यसत्तेशी संघर्ष करुन सुरक्षित ठेवले.७ धार्मिक अभिमान , धैर्य, देशप्रेम, शिस्तबदधता,आत्मविश्वास ,आशावाद या गुणांचा शिवरायांचा वारसा या प्रसंगात मराठी सत्तेला महत्वाचा व मोलाचा ठरला असे म्हणावे लागले. यावरुन शिवरायांच्या लोककल्याणकारी व्यक्तीमत्वाचा आपणास अंदाज येतो.

### *छ. शिवरायांची असामान्य कल्पकता*

शिवाजी महाराजांच्या प्रज्ञेचा असामान्य कल्पकता हा महत्वाचा पैलू होता. आणिबाणीच्या प्रसंगात त्यांचे उत्कृष्ट असा उपयोग ते करत असे शत्रुचे कपट , फसवणूक , गुप्त कारस्थाने यांना शिवरायांनी आयुष्यात कधीही दाद दिली नाही. उलटपक्षी,आपल्याच जाळयात शत्रूला पकडण्यात ते यशस्वी ठरले. संकटाच्या वेळी शिवराय आपली कल्पकता वापरुन सहीसलामत संकटातून बाहेर पडत असे. शहाजीराजांची सुटका, मोऱ्यांचे उच्चाटन , अफजलखानाचा पराभव , स्वतःची पन्हाळयाहून सुटका, विशालगडावरचा चकवा , सुरतेची लुट, आग्राहून सुटका ,मोगल साम्राज्यातून परतीचा सहीसलामत प्रवास इ. सर्व रोमांचकारक गोष्टी त्यांच्या आयुष्यात घडत गेल्या या संगळयातून शिवरायांचे अव्दितिय व्यक्तीमत्व आपणास दिसून येते.[८]

### *महाराष्ट्राचा सिंह*

छ.शिवरायांना त्यांचे शत्रू 'डोंगरातील उंदिर' आणि 'अविवेकी खलपुरुष' म्हणत, ते असे एक सत्पुरुष होते. छ. शिवराय खऱ्या अर्थाने पर्वत पुरुषही होते. त्यांचे चाहते त्यास 'महाराष्ट्राचा सिंह' असे अभिधान देतात. महाराष्ट्रातील गरीब,पददलित,दैववादी बहूजनांना राजांनी आपल्या विचाराने आणि प्रेरणादायी व्यक्तीमत्वाने अलौकीक अशी कर्तबगारी दाखवण्यास प्रवृत्त व सक्षम बनवले आणि त्यांचे रुपांतर उत्तम सैनिक ,धाडसी पाठीराखे, परिपूर्ण सेनापती , विधायक दृष्टी चे राजनितीक अधिकारी यांच्यात करुन शेकडो लढाया जिकंणाऱ्या मोगलांना तोंड देण्यास त्यांना समर्थ बनवले. म्हणून शिवरायांचा गौरव एक किमयागार, एक अलौकीक पुरुष असा केल्यास काहीही वागवे ठरणार नाही. त्यांच्या कर्तबगारीमूळे भारतीय इतिहासाची पाने सदैव झळाळून उठतील यातही शंका नाही.

### *निष्कर्ष*

१.छ. शिवराय यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करणे काळाची गरज आहे.
२.छ.शिवरायांच्या व्यक्तीमत्वातील गूण आजच्या काळातील तरुण पिढीने स्विकारल्यास तरुणांचा विकास होऊ शकेल
३.छ. शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वातून स्त्री वर्गाचा केलेला आदर दिसून येतो.
४.आजच्या आधूनिक काळात स्त्रीयांविषयीची आदरभावना बदललेली असून त्यामध्ये शिवकाळातील स्त्री आदर्श दिसून येत नाही.
५.शिवरायांच्या जीवन चरित्रातून त्यांचा लोककल्याणी कारभार, धर्मनिरपेक्षपणा व मानवतावादी दृष्टीकोन यांचा परिचय महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेनी व अभ्यासकांनी करुन घ्यावयास हवा.
६.आधूनिक राजकारणात व समाजकारणात शिवछत्रपतीच्या विचांराची अत्यंत आवश्यकता असून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
७.आजच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे जे पुढारी आहे. त्यांच्यात शिवरायांसारख्या पवित्र्य व निस्वार्थी विचार असणे आवश्यक आहे.
८.शिवचरित्राचा अभ्यास केल्यास असे वाटते की, शिवरायाप्रमाणेच राष्ट्राच्या सार्वकालिक नेत्याचे चरित्र आणि धोरण असले पाहिजे. तरच त्यांचे कार्य जगात अमर स्वरुपात तळपत राहील.
९.यावरुन विचाराला कृतीची जोड दिल्यास कोणतेही कार्य यशस्वी होऊ शकते हे शिवरायांच्या व्यक्तिमत्वातून व कतृत्वातून दिसून येते.

### संदर्भ

१.डॉ.सोमनाथ रोडे, इतिहास संशोधन पत्रिका, अंक अकरावा, मराठवाडा इतिहास परिषद , औरंगाबाद, २०१४ , पृ. १२४
२.प्रा. टि.के , बिरादार , मराठयांचा इतिहास – शिवाजी आणि शिवकाळ , विदयाभारती प्रकाशन लातूर , २००० , पृ. १२६
३.डॉ. जयसिंगराव पवार, छत्रपती शिवाजीमहाराज स्मृतीग्रंथ , महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे , पृ. ५६.
४.तत्रैव, पृ – ५७
५.लोकराज्य , छत्रपती श्री शिवाजीमहाराज त्रिशत सांवत्सरिक पुण्यतिथी विशेषांक , वर्ष – ३५ , अंक १८ , मुंबई, १६८०
६.प्रा. कमलाकर दिक्षीत , शिवाजीराजांचे व्यक्तीमत्व , प्रकाशित शशोधनिंबध , पृ. ०३.
७.डॉ. जयसिंगराव पवार , छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रथ , महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पूणे , पृ. ६०–६१.
८.Shivaji The Great, vol- 1 , Part 4, Bombay , 1932.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org